# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

## Date: 10 October 2023

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी औरंगाबाद**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक : १० ऑक्टोबर २०२३ दुपारी १.०० वा.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. या खेळाडूंनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल पंतप्रधानांनी त्यांना आमंत्रित केलं आहे. खेळाडू, प्रशिक्षक आणि भारतीय ऑलिंपिक संघटना तसंच विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत.

****

जागतिक मानसिक आरोग्य दिन आज पाळला जात आहे. मानसिक आरोग्य एक मानवी हक्क, ही यंदाची या दिनाची संकल्पना आहे. स्वत:च्या मानसिक आरोग्याच्या मुलभूत अधिकारासह इतरांच्या अधिकारांचंही संरक्षण करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करण गरजेचं असल्याचं, जागतिक मानसिक आरोग्य संघटनेनं सुचवलं आहे. देश, वेश, प्रांत, भाषा, वर्ण, वर्ग अशा कोणत्याही गोष्टी मानसोपचार मिळवण्यासाठी अडसर ठरु नयेत, आणि आपण सर्वांनी आपापल्या परिने प्रयत्न करायला हवेत, असं मत महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्थेच्या वैद्यकीय मानसशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉक्टर दीपिका पाटील यांनी व्यक्त केलं आहे.

****

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं खाजगी एफएम वाहिन्यांसाठीच्या सीबीसी जाहिरात दरात सुधारणा केली आहे. नवीन सुधारणांनुसार मार्च २०२३ पर्यंतच्या आधारभूत दरात केलेली ४३ टक्के वाढ समाविष्ट आहे. तसंच एफएम रेडिओवरील जाहिरातीचा सखल आधारभूत दर प्रत्येक दहा सेकंदासाठी ५२ रुपयांवरुन वाढवून ७४ रुपये करण्यात येणार आहे. सध्या देशात कार्यरत असलेल्या चारशेहून अधिक कम्युनिटी रेडिओ केंद्रांच्या उत्पन्नातही या वाढीव दराचा फायदा होणार आहे.

****

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी विविध आधुनिक कौशल्य अभ्यासक्रम राबवण्याची सूचना, राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी केली आहे. काल मुंबईत कौशल्य विद्यापीठाच्या कामकाजाचा आढावा घेताना, ते बोलत होते. पनवेल इथल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या जागेवर विद्यापीठाची इमारत तसंच आयटीआयची नवी वास्तू उभारण्याच्या पहिल्या टप्प्याचं काम पुढील वर्षी जून पर्यंत पूर्ण होणं अपेक्षित असल्याचं, कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर यांनी यावेळी सांगितलं.

****

शासनाच्या विविध महामंडळांच्या योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवण्याचे निर्देश, छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी दिले आहेत. छत्रपती संभाजीनगर इथं काल विविध महामंडळांमार्फत राबवण्यात येत असलेल्या योजनांचा आढावा बैठकित ते बोलत होते. ब्रह्मगव्हाण उपसा जलसिंचन योजनेअंतर्गत कालव्यांसाठी करावयाच्या भूसंपादन प्रक्रियेचाही पालकमंत्र्यांनी काल आढावा घेतला.

****

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरील नियोजित अती उच्चदाब वाहिनी टॉवरचं काम स्थगित करण्यात आलं आहे. या कामामुळे जालना ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान वाहतुक वळवण्याचं नियोजन करण्यात आलं होतं, मात्र काम स्थगित केल्यामुळे वाहतुक पूर्ववत सुरु राहिल, असं राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता आणि प्रकल्प संचालक रामदास खलसे यांनी सांगितलं.

****

धुळे शहरातल्या अवधान टोल नाका इथं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी खासगी चारचाकी वाहनांकडून टोल वसुली करण्यास विरोध करत वाहनं सोडली. टोल नाक्यावर मनसेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत आंदोलनही केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नाशिक जिल्ह्यातल्या वणी इथलं सप्तशृंगी देवीचं मंदिर शारदीय नवरात्रोत्सव काळात भाविकांना दर्शनासाठी २४ तास खुलं राहणार आहे. तहसीलदार रोहिदास वारुळे यांच्या उपस्थितीत नवरात्रोत्सव नियोजनासंदर्भात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

****

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा 'ज्ञानतीर्थ' हा आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव, १२ ते १५ ऑक्टोबर दरम्यान लातूर इथल्या दयानंद कला महाविद्यालयात होणार आहे. अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड हिच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन होईल. या महोत्सवामध्ये 'मराठवाडा मुक्तिसंग्राम: लढा स्वातंत्र्याचा-गाथा बलिदानाची' या विषयावर शोभायात्रा काढण्यात येणार आहे. महोत्सवाचा समारोप प्रसिद्ध अभिनेते समीर चौघुले यांच्या उपस्थितीत होणार आहे.

****

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज धरमशाला इथं इंग्लंड आणि बांग्लादेश दरम्यान सामना सुरु आहे. आजचा दुसरा सामना हैदराबाद इथं पाकिस्तान आणि श्रीलंकेदरम्यान दुपारी दोन वाजरा सुरु होईल.

****

मलेशियात १२ ते १५ ऑक्टोबर दरम्यान होणार्या खो - खो स्पर्धेसाठी राष्ट्रीय संघात राज्यातल्या चार खेळाडुंची निवड झाली आहे. यात धाराशिव जिल्ह्यातले किरण वसावे आणि संपदा मोरे, मुंबईचा निखिल सोडिये आणि सोलापूरची प्रिती काळे यांचा समावेश आहे. राष्ट्रीय संघाच्या प्रशिक्षकपदी छत्रपती संभाजीनगर इथले विकास सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे.

****